नाव माझे 'टॉर्टी'! ५



१ कारस्थानी 'मोजो जोजो'!



जपून ठेवा, अनमोल 'ठेवा'! १२



NIE Website

अंकासाठी संपर्क 98815 98815

सकाळ


पुणे, शुक्रवार, १६ मे २०२५ ■ पाने १२ किंमत ₹ ६


NiE NEWSPAPER IN EDUCATION


# कृष्णविवराने गिळला तारा!

**अवकाशात एक आगळीवेगळी घटना घडलीय! सूर्यपेक्षा किती तरी मोठं असं एक कृष्णविवर- म्हणजे 'ब्लॅक होल' शास्त्रज्ञांना दिसलंय. आता तुम्ही म्हणाल, की कृष्णविवर दिसलं, त्यात काय आगळंवेगळं?... यापूर्वीसुद्धा शास्त्रज्ञांना अवकाशातल्या कृष्णविवराची माहिती मिळाली आहेच की!**

**आगळीवेगळी आहे, ती हे कृष्णविवर सापडण्याची गोष्ट. पृथ्वीपासून खूप दूरवर अवकाशात असणाऱ्या एका हलत्या-डुलत्या कृष्णविवराने प्रचंड गुरुत्वाकर्षणाच्या साह्याने त्याच्याजवळून जाणाऱ्या एका ताऱ्याला आपल्या घशात ओढलं. हा तारा उद्ध्वस्त झाला आणि कृष्णविवरात गुडूप झाला! तारा ओढला, ताणला जाऊन आणि फुटून कृष्णविवरात ओढला जाताना अवकाशात त्या ठिकाणी झगझगीत प्रकाश दिसला, त्याचे फोटो शास्त्रज्ञांच्या दुर्बिणींनी टिपले. तेव्हाच या अतिभव्य कृष्णविवराचे अस्तित्त्व समजले. चला तर मग, आज आपण या रंजक घटनेविषयी थोडं आणखी जाणून घेऊया.**




या नवीन कृष्णविवराने तारा गिळताना दिसलेला प्रकाश.

## कृष्णविवर (ब्लॅक होल) म्हणजे काय?

- 'कृष्णविवर' या शब्दाचा आपण 'शब्दश:' अर्थ बघू- 'कृष्ण' म्हणजे काळ्या रंगाचे आणि 'विवर' म्हणजे एखाद्या बिळासारखा खोल खोल खड्डा! आपल्या अवकाशात अनेक कृष्णविवरं आहेत. कृष्णविवर म्हणजे अवकाशातली प्रचंड गुरुत्वाकर्षण असलेली एक जागा असते. त्या ठिकाणी गुरुत्वाकर्षण इतके जास्त असते, की अगदी प्रकाशसुद्धा त्यातून आरपार जाऊ शकत नाही, त्यात गुडूप होतो.
- तुम्ही 'व्हॅक्युम क्लीनर' बघितलाय का? व्हॅक्युम क्लीनरमध्ये जसा केरकचरा आत खेचला जातो, तसंच कृष्णविवराच्या अगदी जवळून जाणारा तारा आत ओढला जातो.
- कृष्णविवरातून प्रकाश बाहेर आरपार जाऊ शकत नसल्यामुळे ती दिसत नाहीत. त्यांचं अस्तित्व सहजासहजी शोधता येत नाही. मग कृष्णविवरं कशी सापडतात? तर वर आपण उल्लेख केल्या तशा घटना घडतात तेव्हा. अवकाशात ज्या ठिकाणी कृष्णविवर असते, त्याच्या अगदी जवळ असलेल्या ताऱ्यांची हालचाल शास्त्रज्ञ आधुनिक दुर्बिणींद्वारे टिपतात आणि त्याद्वारे त्यांच्या लक्षात येतं की कृष्णविवर नेमकं कुठे आहे.



## कृष्णविवर कसं तयार होतं?

अवकाशात एखादा खूप मोठा तारा जेव्हा मृत होतो, तेव्हा त्या ताऱ्याचं केंद्र तिथल्या-तिथेच खाली खचतं. त्या ठिकाणी कमी जागेत खूप वस्तुमान सामावलं जातं आणि प्रचंड गुरुत्वाकर्षण असलेला एका प्रदेश तयार होतो. तेच कृष्णविवर!

## कसं आहे हे नवीन कृष्णविवर?

- शास्त्रज्ञांना सापडलेलं हे नवीन कृष्णविवर खूप मोठं- 'सुपरमॅसिव्ह' आहे! सूर्याच्या वस्तुमानापेक्षा या कृष्णविवराचं वस्तुमान १० लाख पटीने अधिक आहे.
- पृथ्वीपासून ते ६०० दशलक्ष (म्हणजे ६० कोटी) प्रकाशवर्षं दूर आहे. प्रकाशवर्ष हे अवकाशातील अंतरं मोजण्याचं एकक आहे. थोड्या ढोबळ आणि सोप्या भाषेत समजून घ्यायचा प्रयत्न करूया... अवकाशयानातून १ प्रकाशवर्ष इतकं अंतर कापायचं असेल, तर माणसाला जवळपास २७ हजार वर्षं लागतील! म्हणजे ६०० दशलक्ष प्रकाशवर्षांचं अंतर कापायला किती वर्षं लागतील याचा नुसता विचार करून पहा! लक्षात घ्यायचं, ते हेच की हे कृष्णविवर पृथ्वीपासून खूप खूप दूर आहे. पृथ्वीला त्यापासून धोका नाही.
- सर्वसाधारणपणे जेव्हा कृष्णविवरांचं अस्तित्व अशा एखाद्या घटनेनं शास्त्रज्ञांना कळतं, तेव्हा ते कृष्णविवर एखाद्या दूरच्या आकाशगंगेच्या केंद्रस्थानी असल्याचं लक्षात येतं. हे आताचं नवीन कृष्णविवर मात्र त्याच्या आकाशगंगेच्या केंद्रस्थानी नाहीये. असं शास्त्रज्ञांना पहिल्यांदाच आढळलं आहे. याच्याही पुढे जाऊन शास्त्रज्ञांना असं समजलंय, की हे नवीन कृष्णविवर ज्या आकाशगंगेत आहे, त्या आकाशगंगेच्या केंद्रस्थानी दुसरं एक त्याच्याहीपेक्षा भव्य कृष्णविवर आहे.

## हे कृष्णविवर का महत्त्वाचं?

या कृष्णविवरामुळे शास्त्रज्ञांना अवकाश संशोधनातील एक नवं क्षेत्र खुलं झालं आहे. भविष्यात आकाशगंगांच्या केंद्रस्थानी नसलेल्या अशा कृष्णविवरांबद्दल आणखी संशोधन होईल.

- प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ व खगोल अभ्यासक स्टीफन हॉकिंग यांच्या कृष्णविवरांसंबंधीच्या दोन व्याख्यानांचं Black Holes : The BBC Reith Lectures (2016) हे पुस्तक प्रसिद्ध आहे.
- त्यांच्या The Brief History Of Time (1988) या पुस्तकातही कृष्णविवरांविषयीची माहिती आहे.

# माझी शाळा....

जिथे असतो काळा फळा
ती आहे प्रिय माझी शाळा!

शाळा आहे शिक्षणाचा आधार
जीवनशिक्षणाचा आहेस तू विस्तार!

तुझ्यामुळेच मिळते शिक्षणाचे जीवनदान
तूच तर आहेस माझा अभिमान!

जेव्हा बनतो आपण शिस्तप्रिय विद्यार्थी छान,
तेव्हा उंचावतेच आपल्या शाळेची मान!

शाळेत शिकतो आपण ज्ञानाच्या गोष्टी
मग आपल्याला नव्याने कळते सृष्टी

कधी होतो शाळेत माझा सन्मान,
तेव्हा मी शाळेला करतो कोटी कोटी प्रणाम!

शाळेचा लागला आहे मला लळा
आता दररोज शाळेतच पळा!

शाळा दाखवते शिक्षणाची वाट
शाळेतून वाहतो ज्ञानाचा पाट

**- सोमनाथ उगले,** नववी
शासकिय मध्यामिक आश्रमशाळा, राजपूर
ता. आंबेगाव, जि. पुणे

# पुस्तक आपले मित्र

दोस्तांनो, पुस्तके ही केवळ आता नावापुरतेच आपले मित्र उरले आहेत का?...

हा प्रश्न मला अनेकदा पडतो, कारण हल्ली कोणी पुस्तके वाचताना मला दिसत नाही. पुस्तके वाचण्याची सवय हल्ली मागे पडत आहे का, असाही प्रश्न मनात येतो.

खरे तर, वाचनामुळे आपल्याला नवनवीन माहिती मिळते. पुस्तक वाचल्यामुळे अनेक गोष्टी आपल्याला शिकता येतात. एवढेच नव्हे, तर पुस्तकांमुळे आपले मनोरंजनसुद्धा होते. तुम्हाला माहिती आहे का, की संपूर्ण जगभरात एक दिवस पुस्तकांसाठी साजरा केला जातो, तो म्हणजे जागतिक पुस्तक दिन!

जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो. जागतिक पुस्तक दिनाची सुरुवात १९९५ मध्ये युनेस्कोने केली. त्या वेळी प्रथम पुस्तकांचा आणि वाचनाचा उत्सव म्हणून हा दिन साजरा करण्यात आला होता.

आता जगातील १०० हून अधिक देशांमध्ये पुस्तकदिन साजरा केला जातो. आयर्लंड आणि ब्रिटनमध्ये ७ मार्चला पुस्तक दिन साजरा करतात.

मात्र, पुस्तके केवळ पुस्तक दिनापुरतीच पुस्तके वाचली पाहिजेत असं अजिबात नाही. आपण सर्वांनी नेहमी पुस्तके वाचली पाहिजेत.

मी या उन्हाळ्याच्या सुट्टीत खूप पुस्तके वाचली आणि आणखीही वाचणार आहे. तुम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत कमीत कमी एक तरी पुस्तक वाचा! मग तुम्हाला असे लक्षात येईल की, पुस्तकांसारखा दुसरा कोणताही उत्तम मित्र नाही! हा मित्र नेहमी तुम्हाला मदतच करेल!

**- भक्ती नरवडे, सहावी**
हुजूरपागा कात्रज प्राथमिक शाळा, पुणे

# गड-किल्ल्यांच्या देशा...



रायगड, राजगड, सिंहगड, विशाळगड, पन्हाळा यांसारखे अनेक गड-कोट महाराष्ट्रात आहेत. हिंदवी स्वराज्याचा खरा पराक्रम या गडांच्या आसमंतात घडला. शिवकालीन पराक्रमाचे, वैभवाचे, संकटांचे व सुख-दुःखाचे अनेक प्रसंग या गडांनी पाहिले. त्यामुळेच आमच्या शाळेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास साडेतीनशे वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून दुर्गभ्रमंती हा उपक्रम हाती घेतला होता.


शत्रूने चळाचळा कापावे अशी पोलादी छातीच्या व दगडी मनगटांच्या मावळ्यांची जरब होती. या मावळ्यांनी पन्हाळा ते विशाळा अशी मोहीम म्हणजे पावनखिंड गाजवली. या वाटेत दगड-धोंडे, खोलगट घळ, झुडपे, पाण्याचे लोट, शेवाळ्याच्या निसरड्या वाटा अन् चिखलच होता. त्याही स्थितीत मोजक्या मावळ्यांनी केलेल्या पराक्रमाची शर्थ आठवा! ही माणसेच मुळी महाराष्ट्राचा संसार थाटण्यासाठी जन्माला आली होती...

त्यांना स्मरून आम्ही दुर्गभ्रमंतीचा पहिला टप्पा पन्हाळा ते विशालगड पायीवारी हा ठरवला. पैठण ते पन्हाळा बसने प्रवास केल्यावर दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे संततधार पावसात महाराजांचे मावळे व महाराज ज्या वाटेने चालले, त्या वाटेला नमन करून वारीला प्रारंभ झाला. आम्हा सर्वांचा ऊर अभिमानाने भरून आला होता.


वाटेत मध्येच एखाद्या घसरणीवर कुणी तरी घसरायचं, पण तेवढ्यात कुणी तरी पटकन त्याला हात द्यायचं. घनदाट जंगलात चालताना जंगली श्वापदे बिथरावीत म्हणून कुणी मोठ्याने आरोळ्या ठोकायचं. कुणी भरभर पुढे चालायचं तर कुणी कासवगतीने. कुणी आलेला अडथळा पटकन उडी मारून पार करायचं, तर कुणी बदकन त्या अडथळ्यामुळे पडायचं. कुणी जाळीत अडकायचं, तर कुणी शरीर वाकवून पटकन त्यातून बाहेर निघायचं. कुणाच्या पायाला अचानक दोन-चार जळू लागलेले दिसायचे... मग तो लटपटायचा, ओरडायचा की, ‘आधी जळू काढा माझे, मग व्हिडिओ काढा!’ असा हा ६० किलोमीटरचा थरारक प्रवास विशाळगडावरील बाजी व फुलाजी यांच्या समाधिस्थळावर नतमस्तक होऊन संपन्न झाला.

आज त्या घटनेला साडेतीनशेहून अधिक वर्षे पूर्ण झालीत, तरीही मावळ्यांची शौर्यगाथा अभंग आहे. त्यांच्या एका हातावर तुळशीपत्र उमलत होते अन् दुसऱ्या हातावर शौर्याचा निखारा फुलत होता. बाजी आणि फुलाजी हे त्यांतीलच एक! त्यांच्या समाधिस्थळावर नतमस्तक होताना अंगावर शहारे आले. महाराजांना महादेव मानून प्राणांची बिल्वदले महाराजांच्या ओंजळीत टाकणारे हे पुरुषोत्तम! त्यांच्या साहसास शतशः नमन!

**- उज्ज्वला कुटे, सहशिक्षिका,**
आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण




**जयेश गायकवाड,** सातवी, न्यू हायस्कूल
जेऊर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर




**अद्वय नाईक,**
सरहद स्कूल, कात्रज, पुणे



**सोहम परब,** सहावी, भारतीय जैन संघटना
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वाघोली



**अनुराग अविनाश वाळुंज,**
डॉ. मार्थोफिलस स्कूल धानोरी, पुणे



**प्रिया गायकवाड,** सातवी
जि.प.प.स. भाटशिरपुरा, ता. कळंब, जि. धाराशिव



**हर्षल चौरे,** दहावी
श्री महावीर विद्यालय, नाशिक

? २ बाजी व फुलाजी यांची समाधी कोणत्या गडावर आहे?

✓ ४ माय नेबर तोतोरो हा चित्रपट १९८८ मध्ये तयार झाला.

# जुनापाना कचरा?... नाहीच मुळी!

“ह्यँ! उन्हाळ्याच्या सुट्टीत कुणी खोली आवरत बसतं का?” असं म्हणून सुहृद पुटपुटत आणि पाय आपटत आपल्या खोलीत गेला. पण आज त्याने त्याची खोली आवरायचीच आहे, या निर्णयावर आई ठाम होती. सुहृदचे आजी-आजोबा दुपारी आले होते आणि त्यांनी त्याचा आवडता रवा केक आणला होता. पण आईनं जाहीर करून टाकलं, की ‘सुहृद जोपर्यंत खोली आवरणार नाही, तोपर्यंत त्याला केक मिळणार नाही!’ नेमकं काय झालं होतं?...



## कचरा? की...

सुहृदचं शाळेच्या साहित्याचं कपाट उघडलं, की कोंबलेली वह्यापुस्तकं धडाधड खाली यायची. तीच अवस्था त्याच्या कपड्यांच्या कपाटाची! आज मात्र त्याच्या आईचा राग अनावर झाला आणि ‘कोणत्याही परिस्थितीत आताच्या आता खोली आवरायची,’ असं तिनं त्याला सांगितलं.

सुहृदने आधी शाळेचं कपाट उघडलं आई म्हणाली, ‘हं! आता शाळेची पुस्तकं, वह्या, गाइड्स, निबंधमाला, भूगोलाचे नकाशे, सगळं वेगळं कर. कपड्यांच्या कपाटाचंही तसंच करायचं आहे...’ सुहृदला आई म्हणते ते करावंच लागलं.

वापरलेल्या वह्यांची मोठी थप्पी लागली. नेहमीचे वापरातले कपडे घडी करून झाल्यावर सुहृदने अंगाला लहान होणारे आणि ‘न आवडणारे’ कपडे वेगळे काढले. कॉंप्युटरचा माउस चालेनासा झाला होता. तो वेगळा ठेवला.

“चला, आता हे सगळं कचऱ्यात भरतो... ” सुहृद म्हणाला.

“आलाय मोठा कचऱ्यात टाकणारा!” आई गरजली.

## जुनं ते सोनं

“आई, अगं असं काय म्हणतेस?... वापरलेल्या वह्या, नको असलेली पुस्तकं, लहान होणारे, फाटलेले कपडे, बिघडलेला माउस, हे फेकावंच लागणार ना!”

“सुहृद, तू आता सातवीत जाशील. इतकी वर्षं तुझी जुनी वह्या-पुस्तकं, जुने कपडे, वस्तू आम्ही फेकून देत होतो, असं वाटतं की काय तुला?... घरात लक्ष पाहिजे!” आई म्हणाली.

आता आजीनं संभाषणात भाग घेतला. ती म्हणाली, “सुहृद, जुन्या वह्यांमध्ये जी पानं कोरी राहिली आहेत, ती काळजीपूर्वक फाडून बाजूला काढ. आजोबांच्या एका मित्रांचं बाइंडिंग करायचं दुकान आहे. ते दरवर्षी आपल्याला छान रफ वह्या करून देतात... आणि समजा त्यांना जर वेळ नसेल, तर आपण मोठ्या स्टेपलरच्या भक्कम पिना मारून रफ पानांच्या लहान वह्या तयार करू. वाणसामानाची यादी लिहायला, निरोप लिहायला आणि रफ अभ्यास करायलाही याच वह्या वापरायच्या.”

पुनर्निर्मितीचे महत्त्व जाणून घेण्यासाठी स्कॉट एमन्स यांचे ‘Why Do We Recycle? (StoryBots)’ हे पुस्तक तुम्ही जरूर वाचा.

## जुन्याचाही उपयोग

आई म्हणाली, “तुझी सहावीची पुस्तकं, गाइड्स, निबंधमाला, नकाशे, मी ते आजीकडच्या संगीतामावशींच्या मुलीला देणार आहे.”

“...आणि जुन्या कपड्यांचं काय?” सुहृद म्हणाला.


“बाबांच्या ओळखीची एक लहान मुलांसाठी काम करणारी संस्था आहे. लहान होणारे, पण न फाटलेले कपडे आपण धुऊ आणि नीट घड्या करू. बाबा ते त्या संस्थेत देऊन येतील. फाटलेले कपडे तू वेगळे काढ. मी यूट्यूबवर ‘डीआयवाय’ पायपुसण्यांचे व्हिडिओ पाहिलेत. तुझ्या फाटलेल्या कपड्यांपासून मी तशी पायपुसणी शिवणार आहे!”

सुहृदला बिघडलेल्या माउसची आठवण झाली. तेवढ्यात आजोबा म्हणाले, “अरे, तो मोडका माउस मला दे बरं का! आमच्या शेजारचा रवी दादा ‘ई-वेस्ट’ गोळा करणाऱ्या गटात काम करतो. कॉंप्यूटरचा माउस म्हणजे ई-कचरा.”

सुहृदला अचानक आवरण्याचा उत्साह आला. पुढच्या १० मिनिटांत त्यानं जुनं सामान वेगळं करून आईने दिलेल्या कापडी पिशव्यांत भरून ठेवलं.

आपण केलेल्या कामाकडे तो कौतुकाने पाहात होता, तेव्हाच त्याच्यासाठी गरम कोको आणि रवा केकची बशी घेऊन आईनं खोलीत प्रवेश केला!

चित्र रंगवा.




सफर गड-किल्ल्यांची

ओंकार ओक

# शिवप्रतापाचा मानकरी ‘प्रतापगड’

अफझलखानाचा वध ही शिवचरित्रातील एक देदीप्यमान घटना. दिनांक १० नोव्हेंबर १६५९ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा प्रतापगडावर वध केला आणि स्वराज्यावरचं एक संकट दूर केलं. चढायला अगदी सोपा असलेला प्रतापगड हा गिरिदुर्ग महाबळेश्वरच्या जवळ असून, तो सहकुटुंब पाहायलाच हवा असा आहे.



### जायचं कसं?

महाबळेश्वरवरून आंबेनळी घाटाच्या रस्त्यावर वाडा कुंभरोशी गाव आहे. तिथून प्रतापगडाच्या अर्ध्या रस्त्यापर्यंत गाडी जाते आणि पुढे अर्ध्या तासात गड चढता येतो.

### राहण्याची सोय

गडावर पूर्वपरवानगीने मुक्काम करता येतो.

### जेवणाची सोय

गडावर भरपूर उपाहारगृहं उपलब्ध आहेत.



### हे आवर्जून बघाच!

- प्रतापगडाचं स्थान भौगोलिक दृष्टीने अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून इथून सह्याद्रीचा विस्तीर्ण नजारा बघायला मिळतो. प्रतापगडचा झेंडा बुरूज तर आवर्जून बघावा असा आहे.
- प्रतापगडाचे दरवाजे गोमुखी पद्धतीचे असून दरवाजांवर शरभशिल्पे (एका प्राण्याची शिल्पे) कोरलेली आहेत.
- गडावर नेपाळच्या गंडकी नदीतील शिळेपासून घडवलेली भवानी देवीची मूर्ती व स्वयंभू असे केदारेश्वर मंदिर आहे. तेही आवर्जून बघावे असेच.
- प्रतापगडावर नैर्ऋत्य उर्फ भवानी बुरूज, रेडका बुरूज, यशवंत बुरूज अत्यंत देखणे असून अनेक ठिकाणी तटबंदीमध्ये चोरवाटा केलेल्या आहेत.
- प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा सुंदर पुतळा पाहण्यासारखा आहे.

? ३) ‘Why Do We Recycle?’ हे पुस्तक कोणी लिहिले आहे?

✔ १) भूकंपाची तीव्रता रिश्टरस्केलमध्ये मोजतात.

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.



# विक्रमांची अजब दुनिया



## सर्वांत लांब चेंडू टाकणारी फुटबॉल खेळाडू

**आयर्लंड देशाची फुटबॉल खेळाडू मेगन कॅम्पबेल हिने जगात सर्वांत लांबवर 'थ्रो-इन' चेंडू टाकण्याचा विक्रम नोंदवला आहे.** फुटबॉल खेळताना जेव्हा एखाद्या संघाच्या खेळाडूंकडून चेंडू मैदानाच्या बाहेर जातो, तेव्हा विरुद्ध संघाच्या खेळाडूला तो चेंडू हातांनी आत टाकण्यास सांगतात. याला म्हणायचे 'थ्रो-इन'. मेगनने तब्बल १२३ फूट, २ इंच इतक्या अंतरावर चेंडू टाकला आहे. हा विक्रम करणारी ती पहिलीच स्त्री आहे. ३१ वर्षांची मेगन 'लंडन सिटी लायनेसेस' या फुटबॉल संघासाठी खेळते. मेगन म्हणते, "आपला आदर्श कुणी तरी घ्यावा, आपल्यापेक्षा चांगली कामगिरी करण्याचे स्वप्न बाळगावे, असेच सर्वांना वाटते. त्यामुळे इतर कुठल्या खेळाडूने माझा विक्रम मोडला, तर मला आनंदच होईल!"



## उंचच उंच पत्त्यांची इमारत!

**मित्रमैत्रिणींनो, तुमच्यापैकी प्रत्येकाने पत्त्यांचा बंगला कधी तरी नक्की बनवला असेल. नसेल करून पाहिला, तर नक्की करा.** कोलकात्यातल्या अर्णव डागा या मुलाने मात्र एका दिवसात पत्त्यांचा बंगला रचण्याचे ४ जागतिक विक्रम नोंदवले. अर्णवने एका तासात पत्त्यांची ३० मजली इमारत उभी केली, तर १२ तासांत त्याने ६१ मजली टॉवर रचून दाखवला. अर्णव ८ वर्षांचा असतानाच त्याने मजा म्हणून पत्त्यांचा बंगला बनवायला सुरूवात केली. तो मोठा झाल्यावर, करोनाच्या काळात टाळेबंदी असताना त्याला या सरावासाठी भरपूर वेळ मिळाला. तुम्हीही पत्त्यांचा बंगला तयार करण्याचा प्रयत्न करू शकता. मोठे होऊन तुम्ही कदाचित अर्णवचा विक्रम मोडू शकाल!

## सर्कसपटूचा आगळावेगळा विक्रम

**अमेरिकेतील सर्कसपटू लैला नून यांनी फक्त केसांच्या आधारे हवेत लोंबकळण्याचा जागतिक विक्रम नोंदवला आहे.** ३९ वर्षांच्या लैला कॅलिफोर्नियाच्या 'रेडवुड नॅशनल पार्क'मध्ये २५ मिनिटे व साडेअकरा सेकंद केसांच्या अंबाड्याला हुकने दोरी बांधून त्याला लोंबकाळल्या. सर्कसमधली ही एक कला आहे आणि ही प्रात्यक्षिके करताना त्या व्यक्तीच्या सुरक्षिततेसाठी खास खबरदारी घेतली जाते. लैला यांनी या विक्रमासाठी सलग २ वर्षे सरावही केला होता. एक लक्षात ठेवा; तुम्ही लैला यांचा विक्रम करून पाहण्याचा प्रयत्न अजिबात करू नका. कारण योग्य प्रशिक्षण व सराव नसेल, तसेच सुरक्षिततेसाठी अनुभवी लोकांच्या साह्याने काळजी घेतली नाही, तर असे करताना जिवाला धोका होऊ शकतो.




## बर्फावर अनवाणी धाव!



पोलंड येथील पावेल डुराकीविझ यांनी नॉर्वे देशात बर्फाच्या गोठलेल्या तळ्यावर घेतली जाणारी मॅरेथॉन स्पर्धा पायांत काहीही न घालता पूर्ण केली आहे. पावेल यांनी तब्बल ४२.२ किलोमीटर्सचे अंतर ४ तास ५७ मिनिटांत धावत पूर्ण केले. बर्फावर धावताना घसरून पडण्याची भीती असतेच, पण काही ठिकाणी ठिसूळ बर्फाखाली पाणी असते आणि बर्फ खचून पाण्यात पडण्याची भीती असते. अशा वातावरणात पावेल अनवाणी धावले. मॅरेथॉन संपल्यावर मात्र त्यांना त्वरित डॉक्टरांची मदत घ्यावी लागली, कारण त्यांच्या तळपायांतून रक्त येत होते. पावेल नेहमी अनवाणी धावतात व बर्फावर धावायचा नियमित सराव करतात. मॅरेथॉन्समध्ये भाग घेऊन ते व्यसनांविरोधात काम करणाऱ्या एका संस्थेला मदत करतात.

स्क्रीन टाइम

**माय नेबर तोतोरो (१९८८)**



### कशासाठी बघायचा चित्रपट?

- 'निसर्गाशी मैत्री करा,' हा या चित्रपटातील मुख्य संदेश आहे.
- सात्सुकी आणि मे यांना कांता हा मुलगा स्वतःची छत्री देतो. तसेच तोतोरोला सात्सुकी आणि मे जास्तीची छत्री देतात. मैत्रीत एकमेकांच्या नेहमी उपयोगी पडायचे असते.
- भावंडांमध्ये अधूनमधून भांडणे होतातच, पण त्यांच्यात निखळ प्रेम हवे, हे सात्सुकी-मे यांच्या नात्यातून दिसते.

# गोंडस चित्रे आणि गोड गोष्ट!



**दोस्तांनो, मागील अंकात आपण 'स्टुडिओ घिबली'ने तयार केलेल्या आणि 'घिबली' चित्रे असलेल्या एका छान चित्रपटाविषयी जाणून घेतले होते. तो चित्रपट होता 'स्पिरिटेड अवे'. आज आपण तशाच आणखी एका मस्त चित्रपटाविषयी जाणून घेऊ. गोड-गोंडस चित्रांसह तितकीच गोड-गोड गोष्ट असलेला हा जपानी चित्रपट आहे- 'माय नेबर तोतोरो'.**

### चित्रपटाची गोष्ट

'सात्सुकी' आणि 'मे' या बहिणींची आई रुग्णालयात आहे. 'मे' खूप लहान आहे आणि अजून शाळेत जात नाही, तर सात्सुकी साधारण तिसरी-चौथीत आहे. आई रुग्णालयात असतानाच त्यांच्या कुटुंबाला घर बदलावे लागते. त्यांचे नवीन घर गावात आहे आणि या घरात धुळीची छोटी छोटी भुते आहेत. मात्र ही भुते कुणाला इजा पोहोचवत नाहीत. सात्सुकी, मे आणि त्यांचे बाबा, तिघांना नवीन घर आवडते. एके दिवशी 'मे'ला घराशेजारी खेळताना वेगळेच प्राणी दिसतात. ते चक्क दोन पायांवर चालत असतात. त्यांचा पाठलाग करत ती एका प्रचंड मोठ्या झाडापाशी जाते. तिथे तिला एक अतिप्रचंड प्राणी दिसतो. तोच तोतोरो! तो एक 'फॉरेस्ट स्पिरिट'- म्हणजे जंगलातला आत्मा असतो. मे त्याला घाबरत नाही. नंतर सात्सुकीलाही तो भेटतो. तो दोघींशी मैत्री करतो. त्यांना जादूच्या बिया देतो. सात्सुकी व मे या बिया आईच्या बगिच्यात लावतात आणि रोपे उगवण्याची वाट बघतात. एका रात्री मात्र तोतोरोच्या जादूने ही जादूची झाडे एकदम मोठी होतात आणि दोघी बहिणींना अत्यानंद होतो. एकदा आईच्या रुग्णालयातून तार येते, की आईची तब्येत बिघडली आहे, आणखी काही दिवस तिला रुग्णालयात ठेवावे लागेल. आईच्या काळजीने दोघींना रडू येते. 'मे'ला राहावत नाही. ती एकटीच रुग्णालयात जायला निघते आणि हरवते. सात्सुकी तोतोरोच्या मदतीने 'मे'ला शोधते. सात्सुकी व मेची आई बरी होईल का? तोतोरो इतर कुणालाच दिसत नसला, तरी तो असतो का? या प्रश्नांची उत्तरे या चित्रपटात आहेत. हा चित्रपट 'नेटफ्लिक्स'वर आहे.

### चित्रपटाची वैशिष्ट्ये

हा चित्रपट १९८८ मध्ये बनलेला आहे. परंतु त्यातील चित्रे व ॲनिमेशन अतिशय उत्तम आहे. मूळ चित्रपट जपानी असला, तरी त्याचे इंग्लिश आणि हिंदी डबिंगसुद्धा छान झाले आहे. संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून पाहावा असा हा चित्रपट आहे.

माय रेसिपी

दोस्तांनो, उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये आपल्याला उगीच बाहेर खायची इच्छा होते. मुलं-मुली पिझ्झा-बर्गर हवे म्हणून आई-बाबांकडे सारखा हट्ट धरतात. पण बाहेरचा महागडा पिझ्झा सारखा खाणे अयोग्यच. त्याऐवजी आपण कधीतरी घरच्या घरी ब्रेडपासूनही पिझ्झा करू शकतो. चला, आज जाणून घेऊया चविष्ट पिझ्झा टोस्टची सोपी रेसिपी.

# पिझ्झा टोस्ट

### साहित्य

ब्रेडचे स्लाइस (शक्यतो मल्टिग्रेन वा गव्हाचा ब्रेड.), लोणी, टोमॅटो सॉस, चीज क्यूब्ज, कांदा, टोमॅटो, ढोबळी मिरची, ओरेगॅनो पिझ्झा सिझनिंग (बाजारच्या पिझ्झाबरोबर या सिझनिंगच्या पुड्या मिळतात.), चिली फ्लेक्स वा तिखट पूड.

### कृती

ब्रेडच्या स्लाइसला एका बाजूला थोडे लोणी लावा. त्यावर टोमॅटो सॉस पसरून लावा. कांदा, टोमॅटो आणि ढोबळी मिरची यांचे तुम्हाला आवडतील तसे काप करून घ्या. भाज्यांचे काप ब्रेडवर सगळीकडे पसरा. ब्रेडवर चीज क्यूब किसून घाला. आवडत असल्यास त्याच्यावर ओरेगॅनो पिझ्झा सिझनिंग व चिली फ्लेक्स (किंवा लाल तिखट) भुरभुरा. गॅसवर तवा किंवा फ्राईंग पॅन ठेवून त्यावर थोडे लोणी घाला. लगेच उलथण्याच्या साह्याने भाज्या व चीज घातलेला ब्रेडचा स्लाइस तव्यावर ठेवा. आच मंद ते मध्यम ठेवून अर्धा ते एक मिनिट ब्रेडचा स्लाइस भाजा. हा स्लाइस उलटायचा नाही. भाजला गेल्यानंतर ब्रेडचा स्लाइस ताटलीत काढा. असे सर्व पिझ्झा टोस्ट तयार करा. गरम असतानाच त्यांचा आस्वाद घ्या.

### काय काळजी घ्यावी?

भाज्या चिरताना सुरी वापरावी लागणार आहे. ब्रेडचा स्लाइस अलगद गरम तव्यावर ठेवताना व तव्यावरून उलथण्याने उचलून ताटलीत काढतानाही सांभाळावे लागते. या कामांसाठी घरातल्या मोठ्या माणसांची मदत घ्या.

### प्रयोग करा

पिझ्झा टोस्टच्या 'टॉपिंग्ज'मध्ये तुम्ही खूप प्रयोग करू शकाल. नुसते चीज, टोमॅटो सॉस (किंवा तयार पिझ्झा सॉस) व बेसिलची पाने वापरून 'मार्गारिटा पिझ्झा टोस्ट' होतो. नुसते मीठ-मिरपूड घालून तेलावर परतलेली मशरूम्स घालूनही पिझ्झा टोस्ट छान लागतो.



४) माय नेबर तोतोरो हा चित्रपट कधी तयार झाला?

८) नेपच्यूनला स्वतःभोवती फिरायला १९ तासांचा वेळ लागतो.

# नाव माझे ‘टॉर्टी’!

पेटोपिया

**दोस्तांनो, ‘Tortoise’ म्हणजे काय सांगा बघू?... सोप्पं आहे- कासव! आता सांगा ‘Tortoiseshell’ म्हणजे काय?... बरोब्बर! कासवाचं कवच किंवा कासवाची पाठ. आता आम्ही तुम्हाला असं सांगितलं, की हे एका मांजरगटाचेही नाव आहे, तर?... आपण मागच्या वेळी केशरी रंगाची मांजरे आणि तिरंगी मांजरींविषयी जाणून घेतलं होतं. आज जाणून घेऊया मांजरांमधील एका अगदी खासमखास गटाविषयी. ही आहेत ‘टॉर्टोइजशेल’ मांजरे. त्यांचं लाडाचं नाव आहे- ‘टॉर्टी’!**



## ‘टॉर्टी’ मांजर म्हणजे काय?

- ‘टॉर्टी’ ही मांजरामधली कुठली वेगळी ‘ब्रीड’ किंवा प्रजाती नाहीये. मांजराच्या अंगावर जी फर असते, तिचा रंग व त्यावरचं ‘डिझाईन’ यावरून टॉर्टी मांजरे वेगळी ओळखता येतात.
- मागच्या अंकात आपण तिरंगी- म्हणजे ‘कॅलिको’ मांजरांची माहिती घेतली होती; त्यांचा फोटोही आपण बघितला होता. तिरंगी माजरांची फर काळा, केशरी आणि पांढरा या तिन्ही रंगाचे आकर्षक पॅचेस असलेली असते. टॉर्टी मांजरे यापेक्षा वेगळी. टॉर्टी मांजरांच्या फरवर काळा आणि केशरी हे दोनच रंग असतात; पण त्यांच्या अंगावर पांढरा रंग नसतो.
- केवळ काळा आणि केशरी हे दोन रंगच टॉर्टी मांजरांचे वैशिष्ट्य नाही. त्यांच्या फरवरील डिझाईन- म्हणजे रंगांचा ‘पॅटर्न’सुद्धा अगदी वैशिष्ट्यपूर्ण असतो. तुम्ही कधी ‘व्हॅनिला आणि चॉकलेट मार्बल केक’ खाल्लाय का? मार्बल केकमध्ये व्हॅनिलाच्या पांढऱ्या आणि चॉकलेटच्या चॉकलेटी रेषा-रेषांची नक्षी असते. अगदी तसंच काळ्या (किंवा चॉकलेटीसर काळ्या) आणि केशरी रंगांचं डिझाइन टॉर्टी मांजरांच्या अंगावर असतं. काळ्या आणि केशरी रंगाच्या रेषा, ठिपके, डाग एकमेंकांत घुसलेले दिसतात. खूप आकर्षक दिसतो हा रंगांचा पॅटर्न!
- कोणतीही दोन टॉर्टी मांजरे अगदी सारखी दिसणारी नसतात.
- आता पुढच्या वेळी मांजरे दिसली, की त्यात एखादे टॉर्टी मांजर आहे की नाही, हे आवर्जून पहा!

## बोक्यांची संख्या नगण्य!

**जवळपास सर्व ‘टॉर्टी’ मांजरे या माद्या असतात. म्हणजे ‘मांजरी’ असतात! तुम्हाला माहिती आहेच, की जवळपास सर्व तिरंगी (कॅलिको) मांजरेसुद्धा माद्याच असतात! टॉर्टी मांजरांमध्ये दर ३००० टॉर्टी मांजरींमागे फक्त १ टॉर्टी बोका असतो. त्यामुळे टॉर्टी बोका सापडणे अगदीच दुर्मीळ समजतात.**

टॉर्टी आणि कॅलिको पिल्ले



## काही संस्कृतींमध्ये ‘लकी’!

**जगात काही संस्कृतींमध्ये ‘टॉर्टी’ मांजरींना ‘लकी’ समजतात. युनायटेड किंग्डम, आयर्लंड आणि जपानमध्ये घरात टॉर्टी मांजर पाळले, की कुटुंबाचे चांगले होईल, भरभराट होईल अशी काही लोकांची श्रद्धा आहे. अर्थात याला काहीही शास्त्रीय आधार नाहीये बरं! जपानमध्ये मासेमारी करणारे लोक त्यांच्या बोटींवर आवर्जून टॉर्टी मांजर पाळत असं म्हणतात- कारण टॉर्टी मांजर समुद्री वादळांपासून आणि भुतांपासून त्यांचे संरक्षण करेल, असे त्यांना वाटत असे.**



खेळ खेळूयात

# अचूक चेंडू पकड!

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**चेंडू पकडणे, टाकणे आणि झेलणे या सगळ्यालाच कौशल्य लागते. ही कौशल्ये विकसित करण्यासाठीचा एक खेळ आज आपण पाहणार आहोत. या खेळासाठी १ चेंडू लागणार आहे.**

### कृती

- खेळाडूंचे दोन गट करून घ्यावेत. एका खेळाडूने पंच म्हणून मध्ये थांबावे.
- पंच झालेल्या खेळाडूने चेंडू जोरात फेकावा आणि त्याबरोबर दोन्ही गटातील प्रत्येकी एका खेळाडूने चेंडूमागे धावत जावे.
- ज्या खेळाडूने चेंडू पकडला, त्याने तो आपल्या गटातील खेळाडूकडे फेकावा आणि त्या खेळाडूने तो अचूक झेलावा. झेल सुटला वा चेंडू वेगळीकडे टाकला, तर तो खेळाडू बाद होतो.
- ज्या गटाचे जास्त अचूक झेल होतील, तो गट जिंकेल.

### कौशल्ये

- या खेळात धावण्याचा वेग सुधारतो. हाता-पायांची ताकद वाढते. तोल आणि नियंत्रण ही कौशल्ये वाढीस लागतात.
- हा खेळ क्रिकेट, हॉकी, या खेळांसाठी पूरक आहे.



ॲप माझे

## मॉनस्टर हार्ट मेडिक

**दोस्तांनो, तुमच्यापैकी अनेकांना डॉक्टर व्हायची इच्छा असेल. अशा मंडळींना आणि डॉक्टर व्हायचे नसलेल्यांनाही मजे-मजेत हृदयाचे कार्य शिकवणारा एक शैक्षणिक गेम आहे ‘मॉनस्टर हार्ट मेडिक’. हा गेम खेळताना आपल्याला शरीरातील रक्तशुद्धीकरण यंत्रणा आणि हृदयाशी संबंधित आरोग्य समस्यांविषयी शिकायला मिळते.**



## हृदयाचे कार्य शिकवणारा गेम

### कोणासाठी?

- ९ वर्षांवरील कुणासाठीही.
- हृदयाशी संबंधित समस्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना त्याविषयीची जागरूकता लहान वयापासूनच निर्माण करण्यासाठी

### गेममध्ये काय काय?

- या गेममध्ये ‘रॅगनर’नामक एक मॉनस्टर आहे. मॅरेथॉनमध्ये धावण्याची तयारी करताना त्याला बरे वाटेनासे होते आणि त्याला हृदयाचा काही तरी त्रास असावा, असे वाटते. रॅगनरला काय आजार आहे, हे आपल्याला शोधून काढायचे आहे.
- त्यासाठी हा गेम आपल्याला विविध माहिती देतो. उदा. हृय काम कसे करते? रक्तदाब कसा मोजतात? इ.
- काही भाग मनोरंजक बनवला आहे. उदा. गाडीमधून रॅगनरला ‘मेडी सप्लाय सेंटर’ला न्या. वाटेत दिसणारे हृदयाला चांगले असे पदार्थ खा व वाईट पदार्थ घेऊ नका. किंवा रॅगनरचा रक्तदाब मोजा आणि त्याच्या आईला फोन करून विचारा की ‘तुमच्या घरात कुणाला उच्च रक्तदाब (हाय बी.पी.) आहे का?’ या कृती गेममध्ये करायच्या आहेत.
- हा मोफत गेम ‘गूगल प्ले स्टोअर’वर उपलब्ध असून यात जाहिराती नाहीत.

### चांगल्या गोष्टी/ आव्हाने

- लहान मुलांना समजेल अशा शब्दांत गेममध्ये माहिती देण्यात आली आहे.
- परंतु ही माहिती इंग्लिशमध्ये आहे. इंग्लिश माध्यमाच्या व नेहमी इंग्लिश वाचणाऱ्या मुलांना ती लगेच कळेल. इतरांना आकलनासाठी पालक वा शिक्षकांची मदत घ्यावी लागेल.
- हा गेम इतर गेम्ससारखा सरधोपट नाही. यात शिकण्याचा भाग जास्त आहे आणि तो कंटाळा न करता समजून घ्यावा लागतो. काही मुलांना हे थोडे अवघड वाटू शकते.

CYBER SECURITY
Net Protector
NP AV
Total Security
922.566.48.17
922.566.48.11
Mobile Security

५) मॉनस्टर हार्ड मेडिक हा कशाशी संबंधित गेम आहे?

३) ‘Why Do We Recycle?’ हे पुस्तक स्कॉट एमन्स यांनी लिहिले आहे.

# ANNUAL GATHERING

Alchemize

## Preparing for the Event

Teacher 1 : Are the students ready for their performances tomorrow?

Teacher 2 : Yes, most of them have rehearsed. We just need to check the costumes one last time.

Teacher 1 : Great! I'll make sure the stage is set up in time.

## Arranging the Decorations

Student 1 : Do you think the hall decorations are enough?

Student 2 : We could add some more balloons and maybe a few banners with the school's name.

Student 1 : Good idea! I'll help with the banners, you handle the balloons.

## Final Rehearsal

Student 1 : How's the dance going? Are we ready?

Student 2 : Almost! Just need to practice the final pose once more.

Student 1 : Let's get it perfect for tomorrow's show!

## Welcoming Parents

Teacher : Welcome, everyone! Please take your seats. The annual day event will start shortly.

Parent 1 : It's so nice to be here. We're excited to see the performances!

Teacher : We're glad you could make it. We have a wonderful program lined up.

## After the Event

Student 1 : How did the event go?

Student 2 : It was amazing! Everyone did a great job, and the audience loved the performances.

Student 1 : I'm so proud of all of us. We worked hard for this!

## Thanking Volunteers

Teacher 1 : Thank you so much for helping out with the event preparations!

Volunteer : It was my pleasure. The kids were really excited, and I enjoyed helping them with their rehearsals.

Teacher 1 : You did an amazing job! We couldn't have done it without you.

## Giving a Speech

Principal : Good evening, everyone! Welcome to our annual day celebration. It's been an exciting year, and today we celebrate the achievements of our students.

Student 1 : (whispering): I can't believe I'm going to speak in front of so many people!

Student 2 : You'll do great! Just remember to smile and speak slowly.

Principal : Now, let's begin the performances!



# ESSAY WRITING

### How to Write an Analytical Essay?

Last time, we learned about informative essays. This time, we will explore how to write an analytical essay, where your goal is to break down and analyze a specific topic in depth.

An analytical essay involves looking closely at a subject, breaking it into smaller parts, and explaining how those parts work together to form the whole. This could be anything from a movie scene to a poem, or even a social issue.

### Steps to Write an Analytical Essay :

1. **Choose Your Topic :** Pick something that you can examine in detail, like a scene from a movie or a specific event.
2. **Form a Thesis Statement :** Your thesis is your main idea, explaining what you will analyze about the topic.
3. **Gather Evidence :** Look for specific examples or details that support your analysis. If you're analyzing a scene, find quotes or actions that support your argument.
4. **Break Down the Topic :** Look at different aspects of your topic. For example, in a movie scene, you might analyze the characters, setting, and actions.
5. Explain the Significance : Explain why these parts matter and how they contribute to the overall meaning.
6. **Write a Strong Conclusion :** Wrap up your essay by summarizing your analysis and restating your main point.

### Example Topics

The Importance of the Setting in 'The Lion King' : Analyze how the setting of the Pride Lands affects the story.

The Role of the Main Character in 'The Tortoise and the Hare' : Analyze how the tortoise's actions lead to his success.

### Sample Sentence :

"In 'The Lion King,' the setting of the Pride Lands is important because it reflects the balance of nature, which is key to the story's message of responsibility and growth."

An analytical essay helps you understand and explain how parts of a topic fit together to create a bigger picture!

Alphabet Express

शीतल करंदीकर

दोस्तांनो, 'Alphabet Express' पुढच्या स्टेशनवर आली आहे. आज V चा चेहरा चांगलाच उजळला आहे. याचं कारण म्हणजे त्याला समजलं आहे, की आज जो प्रवासी या शब्दसफरीसाठी Alphabet Express मध्ये चढणार आहे, तो खूपसा त्याच्यासारखाच दिसतो. तो आपल्या जागी जवळजवळ उभाच राहिला आणि तेवढ्यात त्याला W दिसला. W ने V चा फोटो पाहिला होता, त्यामुळे त्याने त्याला अगदी लगेच ओळखले. मग त्याने अलगद एकेक शब्द बाहेर काढायला सुरुवात केली. बघायचे आहे ना आपल्याला ही W ने काय काय आणलंय ते? चला तर मग!

# W अक्षराचा वापर

१) worry = (उच्चार : वरी) = काळजी = The old man's mind was full of worry for his daughter.


२) worked up = (वर्क्ड अप) = वैतागलेला = He looks very tired and worked up today.

३) wobble = (वॉबल) = डगमगणे = The stool is wobbling and needs to be repaired.

४) weird = (विअर्ड) = विचित्र = He stood in the corner and made weird faces at every passer-by.

५) white lie = वाक्प्रचार (व्हाईट लाय) = भल्यासाठी बोललेले खोटे = She had to tell a white lie today to save her parents from any worry.

६) Wow! = (वाओ) = अचानकच एखादी छान गोष्ट समोर आली की वापरला जाणारा उद्गार = Wow! What a beautiful picture this is!



७) walk the talk = वाक्प्रचार (वॉक द टॉक) = जे बोलतो ते करून ही दाखवणे = You will earn people's trust if you walk your talk about protecting the environment.

८) wriggle = (रिगल) = वळवळणे = A worm wriggled out from an apple which I was cutting today.

९) wart = (वॉर्ट) = चामखीळ = He went to the doctor to get his warts removed.

१०) while away time = वाक्प्रचार (व्हाइल अवे टाईम) = वेळ वाया घालवणे = You must make use of every moment and never while away your time.

११) weaver = (वीवर) = विणकर = Weavers are extremely skilled artists.

१२) waiver off = वाक्प्रचार (वेवर ऑफ) = माफ करणे, सूट देणे = The shopkeeper waivered off a few additional costs for his regular customers.

१३) warmth = (वॉर्म्थ) = ऊब = I enjoy the warmth I feel in my mother's arms.

१४) whole-heartedly = (होल-हार्टेडली) = अगदी मनापासून = She participated whole-heartedly in the Blood Donation campaign.

१५) witty = (विटी) = हुशार आणि चलाख = Birbal is well-known for his witty answers.

१६) whimsical = (व्हीमझिकल) = सनकी = The old woman is appearing to be quite whimsical today; she is screaming at anyone who tries to talk to her.

१७) window shopping = वाक्प्रचार (विंडो शॉपिंग) = कोणतीही खरेदी न करता नुसतेच पाहण्याच्या उद्देशाने बाजारात जाणे = My parents said that we can go out only for window shopping.

१८) wisdom tooth = (विज्डम टूथ) = अक्कलदाढ = I rushed to the dentist because of a painful wisdom tooth.

१९) worldwide = (वर्ल्डवाईड) = जगभर = His work was acknowledged almost worldwide.

२०) watchful = (वॉचफुल) = सतर्क, सावध = Be watchful of any suspicious movement around you.

W ने आज जी काही सर्वांवर जादू केली, ती खरोखर अफाट म्हणता येईल. ही अंगतपंगतीतली भर खूप आवडली सगळ्यांना. आजच्या गंमतपाठात W पासून सुरू होणारे शब्द आपल्याला शोधायचे आहेत आणि त्यांची भर शब्दसफरीमधल्या या मेजवानीत घालायची आहे. चला तर मग!




# THE CLEVER BAKER'S APPRENTICE

Siddhi Sathe

Once upon a time, in a small village, there lived a baker named Rajan. His bakery was the most popular in town, known for its delicious pastries and warm breads. But Rajan was getting old, and he needed an apprentice to help him.

One day, a young boy named Sohan came to Rajan, asking for a job. "I may not know much about baking, but I am willing to learn," Sohan said, eager to help.

Rajan agreed, and soon Sohan began his work at the bakery. He was quick to learn how to knead dough, mix ingredients, and shape the bread. However, Sohan had a little problem-he was always too eager to finish the tasks quickly. One morning, while Rajan was out, Sohan decided to bake a batch of bread all by himself.

He mixed the dough too quickly, didn't let it rise enough, and hurried through every step. When the bread came out of the oven, it was burnt and hard as a rock. Panicked, Sohan thought, "If I don't fix this, Rajan will be very upset!"

Then he remembered an old trick his grandmother had once told him about: "When in trouble, use your wits!" So, Sohan had an idea. He carefully cut the bread into slices, then toasted them lightly. Once done, he spread some butter and jam on top and arranged them neatly on a plate.

When Rajan returned, Sohan nervously showed him the bread. Rajan took one bite and smiled. "This is delicious!" he exclaimed. "You've turned a mistake into something better!"

From that day on, Sohan became known as the clever baker's apprentice, proving that even mistakes can be turned into something sweet with a little creativity


## Word Search

### CINEMA

ACTION, CAMERA, ART DIRECTOR, PRODUCER, STORYBOARD, ACTRESS, SOUNDTRACK, GAFFER, SCREENPLAY, KEY GRIP, MONTAGE, CINEMATOGRAPHER, SET DRESSER, MAKE UP, BOOM OPERATOR, LIGHTING, PROP MASTER, STUNTMAN

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S | T | E | A | P | D | V | I | S | U | A | L | E | F | F | E | C | T | S | O |
| G | C | M | D | R | A | O | B | Y | R | O | T | S | A | D | K | I | T | E | G |
| A | S | A | T | O | C | S | E | T | D | R | E | S | S | E | R | U | S | K | C |
| F | L | C | M | D | T | N | D | S | E | Q | U | E | Y | C | N | K | I | C | A |
| E | V | I | S | E | O | I | G | C | U | C | A | G | A | T | U | E | R | A | M |
| R | I | D | C | R | R | E | S | E | T | D | R | N | M | I | F | Y | U | R | E |
| E | M | A | D | E | P | A | N | S | B | I | T | A | O | F | A | R | O | T | R |
| H | P | E | C | F | U | C | M | A | P | O | N | A | S | I | E | F | L | D | A |
| P | R | T | A | F | E | T | O | A | P | R | O | D | U | C | T | I | O | N | S |
| A | O | S | M | A | K | I | N | U | N | O | C | L | U | D | E | C | C | U | L |
| R | P | U | C | G | A | O | T | D | C | T | N | D | I | D | I | N | A | O | I |
| G | M | R | E | O | M | R | A | I | F | A | O | G | I | G | G | T | E | S | D |
| O | A | S | O | E | R | E | G | T | U | R | M | R | N | N | H | A | I | R | E |
| T | S | C | F | D | N | E | A | I | P | O | E | E | I | I | S | T | E | O | R |
| A | T | O | T | I | U | G | R | O | S | C | O | T | R | C | T | M | I | R | N |
| M | E | S | C | O | M | A | K | E | T | E | I | L | F | A | U | S | O | N | T |
| E | R | T | F | I | C | T | I | O | N | D | R | O | N | T | S | B | A | C | G |
| N | U | U | F | N | L | N | R | C | E | T | Y | C | S | S | E | R | T | C | A |
| I | T | M | E | P | R | O | T | A | R | E | P | O | M | O | O | B | E | R | T |
| C | S | E | Q | U | E | M | C | I | K | S | C | R | E | E | N | P | L | A | Y |

DIRECTOR, PRODUCTION, SEQUENCE, FICTION, CAMERAMAN, ACTOR, COLOURIST, STEADICAM, AUDITION, EDITING, VISUAL EFFECTS, SCENE, CASTING, CAMERA SLIDER, SCORE, COSTUMER, DRONE, SET DECORATOR




1.koala 2.cockatoo 3.kangaroo 4.possum 5.devil 6.ehidna 7.kiwi 8.turtle 9.rabbit 10.wombat 11.platypus 12.takahe

GRAMMAR BITE

# Confusing Conjunctions

Conjunctions are words that connect clauses or sentences, but some conjunctions can be tricky because they have similar meanings or are used in specific situations. Here are some commonly confused ones:

**1. Or vs. Nor**

'Or' offers a choice:

Example : "Do you want tea or coffee?"

'Nor' is used after a negative statement, to continue the negative idea:

Example : "I don't like tea, nor do I like coffee."

**2. Because vs. So**

'Because' explains the reason for something:

Example : "I stayed home because it was raining."

'So' shows the result or consequence:

Example : "It was raining, so I stayed home."




**3. Although vs. Even though**

Both show contrast, but 'even though' is stronger:

Example : "Although it was raining, we went outside."

"Even though it was raining, we went outside."

## सुभाषित

**भूमौ स्खलितपादानां भूमिरेवावलम्बनम् ।**
**त्वयि जातापराधानां त्वमेव शरणं प्रभो ।।**

कोणी जमिनीवर पाय अडखळून पडलं, तर त्याला जमीनच आधार देते; तसंच, हे देवा, तुझ्या बाबतीत कोणाकडून अपराध घडला, तरी शेवटी त्यांचा तूच आधार असतोस.

# संस्कार

**आनंददायी शनिवार**

## सुविचार

मूल्यांनी सजलेले जीवनच खरे समाधान देणारे असते.

## गीता श्लोक

**दैवी सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता।**
**मा शुचः सम्पदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव।।**

दैवी संपत्ती ही मोक्षदायक आणि आसुरी संपत्ती बंधदायक असते, असे मानतात. तू दैवी संपत्तीत जन्मलेला आहेस. शोक करू नकोस.

## दिनविशेष



**१६ मे**

**२०१८ :** साताऱ्याची गिर्यारोहक प्रियांका मोहिते ही ल्होत्से (नेपाळ) शिखर पादाक्रांत करणारी जगातील सर्वांत लहान गिर्यारोहक ठरली.



**२० मे**

**२००० :** जमिनीवरून हवेत मारा करण्याची क्षमता असलेल्या 'त्रिशूल' क्षेपणास्त्राची कोचीन येथे यशस्वी चाचणी.



**२१ मे**

**२००२ :** अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळातर्फे देण्यात येणारा मानाचा 'चित्रभूषण पुरस्कार' ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांना जाहीर.

## बोधकथा

प्रशांत सरुडकर



# राजा आणि धनसंचय

**आदिप्रस्थ राज्यात कमलदीप नावाचा राजा राज्य करत होते. त्यांच्या पूर्वजांनी प्रजाहितदक्ष राजे म्हणून मोठा नावलौकिक मिळवला होता, पण कमलदीप लहानपणापासूनच अत्यंत आळशी होता. राज्यातील गरीब जनता, शेतकरी, कष्टकरी यांच्या हिताची कसलीही काळजी तो घेत नसे.** तिजोरीतले थोडेसे धन कमी झाले असे लक्षात येताच प्रजेवर तो कर लावत असे.

एक दिवस फेरफटका मारण्यासाठी कमलदीप राजा राजधानीबाहेर पडला. नुकताच पावसाळा संपला होता. नदीला पाणी होते. डोंगराच्या कडेची शेते हिरवीगार झाली होती. शेतामध्ये पीके डौलत होती. हे सर्व पाहिल्यावर कमलदीप राजाला अतिशय आनंद झाला. यावर्षी कराच्या रूपाने मिळणारे उत्पन्न दुपटीने तरी वाढेल, असा विचार करत तो पुढे निघाला. काही अंतर चालून गेल्यावर गव्हाचे एक शेत अतिशय डौलाने उभे असलेले त्याला दिसले. शेतकरी त्या शेतात कष्ट करत होता. डौलदार पीक पाहून राजाचा उत्साह वाढला, तेवढ्यात त्याचे लक्ष त्याच्याच शेजारच्या दुसऱ्या शेतजमिनीकडे गेले. त्या ठिकाणी गव्हाचे पीक अत्यंत साधे आले होते. छोटेसे वाढलेले, लहान लोंब्या पडलेल्या. त्याही शेताचा शेतकरी त्याच्या जमिनीत कष्ट करतच होता. शेजारी-शेजारी असणाऱ्या दोन शेतांमध्ये एवढा फरक कसा? त्याने दोन्ही शेतकऱ्यांना जवळ बोलावले.

ज्याच्या रानातले पीक डौलदार आले होते, त्या शेतकऱ्याला विचारले, "तुझे पीक एवढे चांगले, डौलदार कसे?" त्यावर शेतकरी म्हणाला, "महाराज, खतांशिवाय पीक नाही. मी माझ्या गोठ्यातील सर्व खत सर्वत्र टाकले. त्यामुळे माझे पीक एवढे चांगले आले." त्याचं बोलणं ऐकून राजाला समाधान वाटलं. त्यानंतर त्याने अतिशय कमजोर पीक आलेल्या शेतकऱ्याला विचारलं, "तुझ्या शेतातले पीक एवढे कमजोर का?" शेतकरी म्हणाला, "महाराज, मी सर्व शेणखत गोठ्यातून आणून शेतीच्या एका बाजूला ढीग करून ठेवलेले आहेत. मला वाटले ढीग करून ठेवलेल्या खतामुळे आपोआप पिके चांगली येतील!" राजा हसला आणि म्हणाला, "वेड्या, एका जागेवर ढीग केलेल्या खतामुळे सर्व शेतातील पिके चांगली कशी येतील? खत सर्व शेतापर्यंत पोहोचायला हवं." यावर तो शेतकरी म्हणाला, "महाराज, जर राजाने स्वतःच्या खजिन्यात केलेल्या प्रचंड धनसंचयाचा फायदा जनतेला होत असेल, तर एका जागेवर ढीग करून ठेवलेल्या खतांचा उपयोग माझ्या सर्व जमिनीला का होणार नाही?"

शेतकऱ्याचे हे शब्द ऐकताच राजा कमलदीपाला आपल्या लोभी आणि संचयी वृत्तीचा पश्चात्ताप झाला. राजाच्या तिजोऱ्या भरलेल्या आहेत, पण जनता जर कंगाल असेल, तर त्या राजऐश्वर्याचा उपयोग काय? असा प्रश्न त्याच्यापुढे निर्माण झाला. पुढे त्याने अनेक कल्याणकारी योजना आखल्या व तो लोकहितदक्ष राजा म्हणून प्रसिद्ध झाला.

## गुड मॅनर्स

# 'मूड' सांभाळा स्वतःचा, इतरांचाही!

**दोस्तांनो, 'आज माझा मूड नाही,' हे वाक्य तुम्ही खूपदा ऐकत असाल आणि काही वेळा तुम्ही हेच वाक्य समोरच्याला ऐकवतही असाल. मग त्यात आई-बाबा, भावंडे, मित्र, आजी-आजोबा किंवा इतरही लोक असतील. एखाद्या वेळी आपण खरंच निराश असतो. तुम्हा मुलांच्या भाषेत बोलायचं, तर तुम्ही 'सॅड' फील करत असता किंवा काही तरी टेन्शन असतं. मग ते परीक्षेचं असेल, शाळेचं किंवा मित्र-मैत्रिणींशी झालेल्या भांडणांचं. मात्र, विनाकारण सतत 'माझा मूड नाही' हे म्हणून लोकांना टाळत राहणं, कोणाचं काहीच न ऐकणं, कुठेही बाहेर न जाणं हे काही चांगलं नाही, बरं का! याला 'बॅड मॅनर्स' म्हटलं जाईल.**



एखाद्या वेळी तुम्ही कोणाला नाही म्हटलंत, तर ती व्यक्ती समजून घेईलही. मात्र, तुम्ही सतत एखाद्या व्यक्तीला टाळाल, नाही-नको म्हणाल, तर कालांतराने तुम्हाला कोणी काहीच विचारणार नाही. कोणी तुमच्यासोबत खेळणार नाही, घरी बोलवणार नाही किंवा एखादं कामही करणार नाही. तुम्ही एकटे पडाल. तुम्ही 'मूडी' आहात, स्वतःच्या मनाचंच खरं करता, असं लोक बोलू लागतील. याचा त्रास तुमच्या आई-बाबांनाही होईल. शाळेतही कोणीच तुम्हाला त्यांच्या 'ग्रुप'मध्ये घेणार नाही. त्यामुळे हळूहळू तुमच्या मित्र-मैत्रिणींची संख्या कमी होऊ लागेल. हे सगळं टाळायचं असेल, तर इतरांमध्ये मिसळायला शिका. जुळवून घ्या. एखाद्या वेळी फक्त इतरांसाठी काही तरी करा. असं केलं, तर लोकही तुमच्यासाठी अनेक गोष्टी करतील. तुम्हाला बोलवतील, गप्पा मारतील, नवनवीन गोष्टी सांगतील. सर्वांचं तुमच्याशी छान जमेल. त्यामुळे 'मूड' सांभाळा स्वतःचा आणि इतरांचाही!

## अवकाश

सदानंद होशिंग

# ग्रहविचार - नेपच्यून

**मित्रांनो, सूर्यमालेतील आठवा आणि शेवटचा ग्रह म्हणजे नेपच्यून आहे. हा ग्रह सूर्यापासून आठवा ग्रह आहे. युरेनस ग्रहापासूनही याचे अंतर एक अब्ज किलोमीटरपेक्षाही जास्त आहे. याचे सूर्यापासूनचे अंतर ४.५० अब्ज किलोमीटर इतके आहे.** या ग्रहाचा आकार युरेनस या ग्रहाइतका आहे. सूर्यमालेतील हा व्यासाच्या तुलनेत चौथा मोठा ग्रह आहे. याचे वस्तुमान पृथ्वीच्या वस्तुमानापेक्षा सतरा पट मोठे आहे. हा ग्रह वायू आणि द्रव पदार्थांपासून बनला असल्याने त्यावर घन पृष्ठभाग नाही. हा ग्रह सर्वांत जास्त थंड ग्रह आहे.



नेपच्यूनचे वातावरण प्रामुख्याने हायड्रोजन आणि हेलियम, हायड्रोकार्बन्स आणि कदाचित नायट्रोजनच्या खुणा असलेले आहे , परंतु त्यात पाणी, अमोनिया आणि मिथेन सारख्या बर्फाचे प्रमाण जास्त आहे. युरेनसप्रमाणेच, त्याचा आतील भाग प्रामुख्याने बर्फ आणि खडकांनी बनलेला आहे. या दोन्ही ग्रहांना सामान्यतः 'बर्फाचे राक्षस' मानले जाते. नेपच्यूनचा रंग त्यातील मिथेनच्या जास्त प्रमाणामुळे निळा आहे. या ग्रहावर सतत वादळे होत असतात. त्यातील वाऱ्याचा वेग प्रतितास २१०० किलोमीटरपर्यंत जातो.

नेपच्यूनला स्वतःभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास १९ तास लागतात. मात्र सूर्याभोवतीची प्रदक्षिणा करण्यास याला फार मोठा कालावधी लागतो. तो १६५ वर्षांत सूर्याची एक प्रदक्षिणा पूर्ण करतो. त्याला १९ उपग्रह किंवा चंद्र आहेत.

या ग्रहाच्या शोधाचे श्रेय जोहान गॅले, अर्बेन ले व्हेरियर आणि जॉन काउच ॲडम्स यांना दिले जाते. या ग्रहाचा शोध २३ सप्टेंबर १८४६ रोजी लागला.

## योग जीवन

मनाली देव

# अर्ध मत्स्येंद्रासन

हे बैठक स्थितीमधील आसन आहे.

### असे करावे आसन

- प्रथम दोन्ही पाय सरळ करून ताठ बसावे .
- आपण प्रथम डाव्या बाजूने आसन करूया. डावा पाय गुडघ्यात वाकवून उजव्या पायाच्या मांडीच्या पलीकडे उभा करावा. तळपाय जमिनीला टेकलेला असावा.
- डावा पाय टेकवताना त्याचा घोटा उजव्या पायाच्या गुडघ्याजवळ आला पाहिजे. या पद्धतीने पायाची स्थिती असावी. आता उजवा पाय आतील बाजूस मांडी घातल्याप्रमाणे दुमडावा. उजव्या हाताने डाव्या पायाच्या मांडीला वळसा घालून डाव्या पायाचा अंगठा पकडावा. दंडाने मांडीला रेटा द्यावा.
- दुसरा हात पाठीमागे घेऊन जमिनीवर टेकवावा किंवा कमरेवर मागे घेऊन मांडीला पकडावा. मान पूर्ण मागच्या खांद्याकडे वळवावी. कंबर, खांदे, मान अधिकाधिक वळवायचा प्रयत्न करावा. छायाचित्रात दाखवल्याप्रमाणे आसनस्थिती करावी. आसनस्थिती पूर्ण झाल्यानंतर श्वास संथ सुरू ठेवावा व नजर स्थिर ठेवावी किंवा डोळे बंद करावे. आसन सोडताना सावकाश उलट क्रमाने आसन सोडावे व अशीच स्थिती दुसऱ्या बाजूनेसुद्धा करावी.



### लाभ

- या आसनाच्या नियमित सरावामुळे पाठीचा कणा लवचिक होतो.
- कंबरदुखी, पाठदुखी कमी होण्यास मदत होते.
- पोटावरील अतिरिक्त मेद कमी होण्यासाठी उपयुक्त.


**काळजी :**

- ज्यांना गुडघेदुखीचा तीव्र त्रास आहे किंवा पाठीचे किंवा पोटाचे कुठलेही शल्यकर्म झाले आहे. जसे की, हार्निया, कोलाइटिस, अपेंडिक्स वगैरे अशा व्यक्तींनी हे आसन करू नये.

## वाचू आनंदे

# अन्न हे पूर्णब्रह्म

दोस्तांनो, खरं खरं सांगा... तुमच्यापैकी खूप जणांना खाण्यापिण्याच्या खोडी आहेत ना?... रोज पानात भाजी-आमटी वाढल्यावर किंवा डबा उघडून त्यातली भाजी पाहिल्यावर तोंड वाकडं करणारी हीच मंडळी! कारलं ई... दुधी-पडवळ-दोडका ईई... डाळी, उसळी ईईई! असा काहीसा या 'खोड्याळ' लोकांचा शिरस्ता असतो. फक्त भाज्याच नाही बरं का! पोळी-भाकरीचा त्यांना कंटाळा येतो आणि भातसुद्धा बोरिंग वाटतो. मग आवडते काय?... सर्व चटपटीत, कुरूम-कुरूम आणि गोड! पण यात होते असे, की आपल्या शरीराला आवश्यक पोषणद्रव्येच मिळत नाहीत. विविध अन्नघटकांचे कवितारूपात महत्त्व सांगणारे एक पुस्तक आहे 'अन्न हे पूर्णब्रह्म'. अपेक्षा सामंत यांनी या पुस्तकाचे मराठी रुपांतर केले आहे, तर मूळचे इंग्लिश पुस्तक- 'शुगर, स्पाइस ॲण्ड ऑल फूड्स नाइस' हे मेधा राजाध्यक्ष व केटी बगली यांनी लिहिले आहे. उन्हाळी सुट्टीत आपल्याला भरपूर वेळ मिळतो. तेव्हा या सुट्टीत मोठ्यांच्या मदतीने स्वयंपाकघरात लुडबुड करायला हरकत नसावी. त्या दृष्टीने हे पुस्तक कदाचित तुमचा खाद्यपदार्थांविषयीचा दृष्टीकोन बदलून टाकेल आणि तुमचे सामान्य ज्ञानही वाढेल.




? ८) नेपच्यूनला स्वतःभोवती फिरायला किती वेळ लागतो?

✓ २) बाजी व फुलाजी यांची समाधी विशाळगडावर आहे.

'पॉवरपफ गर्ल्स' या १९९० आणि २००० च्या दशकात अतिशय लोकप्रिय असलेल्या अमेरिकन कार्टून मालिकेविषयी आपण मागील अंकात माहिती घेतली होती. या मालिकेतील प्रमुख पात्रे- अर्थात 'पॉवरपफ गर्ल्स' आहेत ब्लॉसम, बबल्स आणि बटरकप या तीन छोट्या मुली! त्या टाउन्सविल या शहरात राहतात आणि रोज अनेर 'व्हिलन्स'शी लढतात. या सगळ्या खलनायकांमधला प्रमुख खलनायक आहे 'मोजो जोजो'! हा मोजो जोजो चक्क एक चिम्पान्झी माकड आहे. चला, आज जाणून घेऊ या अतिशय हुशार, पण तितक्याच कारस्थानी खलनायकाविषयी...

कार्टूनची सफर

अरविंद रेणापूरकर

# कारस्थानी मोजो जोजो!

## मोजो जोजोची 'ओरिजिन स्टोरी'


पॉवरपफ गर्ल्सची निर्मिती एका चुकलेल्या वैज्ञानिक प्रयोगातून झाली, हे आपण मागील अंकात पाहिलं होतं. पण खलनायक मोजो जोजोचा जन्मसुद्धा असाच झाला आहे बरं का! 'प्रोफेसर युटोनियम' यांच्या प्रयोगशाळेत मोजो जोजो हा चिम्पान्झी राहत असतो. तो प्रोफेसरना मदत करत असतो. एके दिवशी मात्र एका प्रयोगादरम्यान अपघात होतो आणि त्यातून पॉवरपफ गर्ल्सची निर्मिती होतो. याच प्रयोगात मोजो जोजोच्या मेंदूवरही परिणाम होतो आणि त्याला प्रचंड बुद्धिमत्ता प्राप्त होते. पण त्याबरोबरच मोजो जोजोच्या मनात पॉवरपफ गर्ल्सबद्दल द्वेषाची भावना निर्माण होते. त्यातूनच मोजो जोजो खलनायक होतो आणि पॉवरपफ गर्ल्स होतात त्याला रोखणाऱ्या नायिका!




## असा आहे मोजो जोजो

- मोजो जोजोचा अंग काळ्या रंगाचे आणि चेहरा हिरवा आहे. मोठा मेंदू झाकणारे हेल्मेट तो घालतो. पॉवरपफ गर्ल्सना हरवून टाउन्सस्विल शहरावर ताबा मिळवणं, हेच त्याचं ध्येय आहे. तो सतत नवीन प्रयोग, यंत्रं, रोबो यांचा वापर करून दुष्ट योजना आखतो. मात्र अनेकदा त्याच्या योजनांमध्ये त्याच्या स्वतःच्याच गर्विष्ठपणामुळे चुका होतात. शिवाय पॉवरपफ गर्ल्स अतिशय चतुर आहेतच; त्यामुळे मोजो जोजो नेहमी हरतो. पण तो हट्टी असल्यामुळे परत परत खलनायकी योजना आखत राहतो.
- मोजो जोजोचं बोलणं हे त्याचं एक खास वैशिष्ट्यच आहे! तो एकच गोष्ट पुन्हा पुन्हा बोलतो! त्याची भाषा कर्कश, नाट्यमय आणि अहंकारयुक्त असते. पण त्याच्या या वेडेपणामुळे आपल्याला हसायलाही येते! ' प्रोफेसर यूटोनियम यांनी पॉवरपफ गर्ल्सनाच जास्त महत्त्व दिलं आणि माझ्याकडे दुर्लक्ष केलं,' असं मोजोला वटत असल्याने तो सूड घेण्याचा प्रयत्न करतो.







## मोजोच्या कटकारस्थानांनी रंगणारी कथानके

मोजो जोजो या कार्टूनच्या प्रत्येक भागात काही तरी नवीन योजना आखतो. पॉवरपफ गर्ल्समधली सगळ्यांत 'क्यूट' आणि प्रेमळ गर्ल आहे 'बबल्स'. एकदा मोजो जोजो ठरवतो, की 'मी या बबल्सला वाईट वागायला लावीन. तिचे खलनायिकेत रूपांतर करीन!' तो त्यासाठी एक यंत्र तयार करतो 'ॲन्टी-बबल्स कन्व्हर्टर'! तो बबल्सला चक्क एका खलनायिकेत रूपांतरित करतो. बबल्स खरंच बदलते आणि ती लोकांना मदत करण्याऐवजी त्यांच्यावर चिडायला लागतो, टाउन्सविलमध्ये गोंधळ घालते. आपल्या बहिणींशी- बॉसम आणि बटरकपशी भांडते. ब्लॉसम आणि बटरकप बबल्सला तिच्या मूर रूपात परत आणण्याचा प्रयत्न करतात. अखेर ब्लॉसम बबल्सला त्यांनी लहानपणी ऐकलेल्या एका गाण्याची आणवण करून देते. हे गोड गाणं ऐकून बबल्सला तिचं मूळचं प्रेमळ रूप आठवतं आणि ती पुन्हा 'गुड गर्ल' होते. नंतर गर्ल्स मिळून मोजो जोजोची योजना उधळून लावतात.

ज्ञान-विज्ञान

डॉ. तन्मयी रानडे

# भूकंप म्हणजे काय?

मित्र-मैत्रिणींनो, जगभरात विविध ठिकाणी भूकंप होत असतात. भारतातही प्रचंड मोठे भूकंप झाले आहेत. वेळोवेळी आपण ह्या घटनांची छायाचित्रे पाहतो, बातम्या वाचतो. त्यामुळे आपल्याला भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या जीवितहानी, आर्थिक नुकसानाची माहिती मिळते. मात्र, हे भूकंप कशाने होतात? त्यामागची कारणे कोणती? हे जाणून घेऊया!

**भूकंप म्हणजे जमीन हादरणे. भूकंप हे पृथ्वीच्या कवचात अचानक हालचाली झाल्याने होतात. पृथ्वीचे कवच हे एकसंध नसून, विविध थरांमध्ये बनलेले आहे. त्यामुळे विविध कारणांमुळे अशा हालचाली घडून येतात.**

## पृथ्वीचे कवच व भूकंप

पृथ्वीचा बाह्य थर मोठ्या, कडक 'प्लेट्स'पासून बनलेला आहे. त्यांना 'टेक्टोनिक प्लेट्स' असे म्हणतात. ह्या प्लेट्सची सतत हालचाल होत असते, पण ती खूप हळूहळू असते. जिथे या प्लेट्स एकमेकांना भिडतात किंवा एकमेकांवर आदळतात, तिथे त्यांच्यावरचा ताण वाढतो. जेव्हा हा ताण एका मर्यादेपेक्षा जास्त वाढतो, तेव्हा प्लेट्स तुटतात आणि साठलेली सर्व ऊर्जा भूकंपाच्या रूपात बाहेर पडते. ही ऊर्जा पृथ्वीच्या पृष्ठभागावर भूकंपाच्या लहरींच्या स्वरूपात पसरते आणि त्यामुळे जमीन हादरते.

## परिणाम

**जमीन हादरणे :** सर्वांत लगेच आणि लक्षात येण्याजोगा परिणाम म्हणजे जमिनीला हादरे बसणे. यामुळे इमारती आणि इतर बांधकामे कोसळू शकतात किंवा त्यांचे काही प्रमाणात नुकसान होऊ शकते.

**भूस्खलन आणि हिमस्खलन :** पर्वतीय प्रदेशात भूपृष्ठाला जोरदार हादरे बसल्याने भूस्खलन किंवा हिमस्खलन होते.

**त्सुनामी :** समुद्राखाली येणाऱ्या भूकंपांमुळे त्सुनामी येऊ शकते. त्यामुळे महाकाय लाटा निर्माण होतात आणि त्यांचा फटका किनारपट्टीच्या प्रदेशाला होतो.



## भूकंपाचा केंद्रबिंदू (Hypocenter)

पृथ्वीच्या पृष्ठभागाखाली जिथे भूकंपाचा उगम होतो, त्या केंद्राला 'हायपोसेंटर' असं म्हणतात. भूकंपाचे खूप मोठे विनाशकारी परिणाम होऊ शकतात. त्यामध्ये जमीन हादरणे, भूस्खलन, त्सुनामी यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. यामुळे आर्थिक हानी, जीवितहानी होते. बांधकामे जमीनदोस्त होतात. मृदेची गुणवत्ता ढासळते. शेतजमीन उद्ध्वस्त होतात.

## भूकंप रोखता येऊ शकतो का?

भूकंप ही नैसर्गिक घटना आहे. त्यामुळे दुर्दैवाने आपण भूकंप रोखू शकत नाही. परंतु, सुरक्षित रीतीने बांधकाम करणे, भूकंपाची पूर्वसूचना मिळू शकेल अशा प्रकारची यंत्रणा बसवणे, भूकंपसदृश स्थिती उद्भवल्यास काय करावे ह्याचे प्रशिक्षण नागरिकांना देणे अशा प्रकारच्या उपाययोजना करून आपण जीवितहानी कमी करू शकतो. आर्थिक नुकसानही टाळता येऊ शकते.

## तीव्रता कशी मोजतात?

भूकंपाचे मोजमाप करण्यासाठी भूकंपमापी वापरली जाते. त्याला 'सिस्मोमीटर' असे म्हणतात. हे उपकरण भूकंपाच्या लाटांमुळे होणारी कंपने मोजतात. ही कंपने म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावर असणाऱ्या ऊर्जेच्या लाटा असतात. भूकंपाची तीव्रता 'रिश्टरस्केल' किंवा मोमेंट मॅग्निट्यूड स्केल वापरून मोजली जाते.


## जागरूक राहा


- दोस्तांनो, भूकंपसदृश हालचालींची जाणीव होताच क्षणाचाही विलंब न करता घरातून बाहेर पडा व मोकळ्या जागेत किंवा मैदानात जा.
- घरातील वृद्ध, अपंग, लहान मुले यांना मोकळ्या मैदानात नेण्याचा प्रयत्न करा.
- या काळात घरातील विजेची उपकरणे बंद करून ठेवा.
- आसपासची उंच झाडे, इमारती, विजेच्या तारा व खांब यांना स्पर्श करू नका.
- डोंगराळ किंवा उंचीवरच्या परिसरात तुम्ही असाल, तर उंचावरून घरंगळत येणाऱ्या दगडांपासून सावध राहा.


? १) भूकंपाची तीव्रता कोणत्या एककात मोजतात?


✔ ५) मॉन्स्टर हार्ड मेडिक हा हृदयाशी संबंधित गेम आहे.

मार्ग शोधा.







चित्र पूर्ण करून ते रंगवा.




खालील चित्रातील दहा फरक ओळखा.



योग्य ठोकळे योग्य जागी बसवा.



# ओरिगामीचे टेबल


**गेल्या दोन हजार वर्षांमध्ये ओरिगामीच्या कलाकारांनी आपली कला वापरली नाही असे एकही क्षेत्र कदाचित शिल्लक नसेल. त्यामुळे आपल्याला दैनंदिन जीवनातील विविध गोष्टी या कलेतून साकारता येतात. आज अगदी सोप्या पद्धतीने आपण ओरिगामीचे टेबल तयार करायला शिकूया. तयार आहात ना सगळे? चला तर मग...**

हस्त कला

मंदार वैद्य




कृती १




चौरस कागद घेऊन समोरासमोरील बाजू एकमेकांना जुळवून घड्या घाला व उलगडा.

कृती २



उजवीकडील व डावीकडील बाजू कागदाच्या मध्यभागी तयार झालेल्या मध्यरेषेवर आणून जुळवा व घड्या घाला.

कृती ३




वरची व खालची बाजू घडी घालून मध्यभागी असलेल्या रेषेला जुळवा व घड्या घाला.

कृती ४




कृती ५



ही घडी घालण्यापूर्वी कृती ५, ६ व ७ चे बारकाईने निरीक्षण करा. दर्शवलेली दोन टोके विरुद्ध दिशेला तुटकरेषेच्या आधाराने हळूवारपणे बाहेर ओढा.

कृती ६




तुमच्या हातातील कागदाची अशी घडी तयार होईल.

कृती ७



कृती सहामधील घडी घालून पूर्ण करा. या प्रकारची कलाकृती तयार होईल. कागदाच्या वरील बाजूस देखील तशाच घड्या घाला.आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे कलाकृती तुमच्या हातामध्ये तयार होईल.

कृती ८



उजवीकडे दोन व डावीकडे दोन अशी चार निळ्या बाणांनी दाखवलेली चार टोके निरखून पाहा. तुटकरेषेने दाखवलेल्या चार घड्यासुद्धा निरखून पाहा. संदर्भासाठी कृती नऊमधील आकृतीचा आधार घ्या.

कृती ९



तुटकरेषांचा आधार घेऊन टोक बाहेर ओढा. या घडीचा योग्य अंदाज येण्यासाठी कृती क्रमांक १० चे बारकाईने निरीक्षण करा. याच पद्धतीने उर्वरित तीन बाजूला घड्या घाला.

कृती १०



तुम्हाला घडीचा अंदाज येण्यासाठी तो भाग गोलामध्ये वेगळा दाखवला आहे.

कृती ११



अशी कलाकृती तयार होईल. खाली असलेली चार टोके थोडी आतमध्ये आणा. हातातील कलाकृती पलटून घ्या.

कृती १२



ओरिगामीचे कागदापासून बनवलेले टेबल तुमच्यासमोर तयार आहे. अशाच प्रकारे ओरिगामीचा सराव सुरू ठेवा.

स्पर्धेत उतरताना

जयवंत बोरसे

# बौद्धिक गुणवत्तावर्धनासाठी...

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.८वी)

### प्रसंग

वर्षाच्या सुरुवातीलाच शाळेत रिक्त जागी मुख्याध्यापक म्हणून सोनवणे सर रुजू झाले. पहिल्याच दिवशी त्यांनी शिक्षकांची सहविचार सभा घेतली. त्यातून त्यांनी शालेय परिस्थितीचा आढावा घेतला.

### समस्या

एकंदरीत अनेक समस्यापैंकी सर्वांत महत्त्वाची समस्या होती, शाळेची दरवर्षी कमी होणारी पटसंख्या. इतर विद्यार्थ्यांसारखेच अनेक होतकरू व हुशार विद्यार्थीसुद्धा या शाळेतून दुसऱ्या शाळेत जात होते. परंतु प्रत्येकजण त्यामागची कारणे वेगवेगळी सांगत होते. शालेय परिसर, भौतिक सुविधांची वानवा, पालकांची उदासीनता, इंग्रजी माध्यमाच्या शाळांची स्पर्धा इ.

### निरीक्षण/ नोंदी:

सरांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे शाळेचे रेकॉर्ड पाहिले. शिक्षक, पालक, शाळेशी संबंधित महत्त्वाचे घटक, विद्यार्थी आणि गावकरी यांच्याशी व्यक्तिगत संवाद साधला. त्यातून अनेक बाबी लक्षात आल्या.



### समस्या सोडवणुकीचा तात्पुरता प्रयत्न:

शालेय परिसराची स्वच्छता, सुरक्षितता व निगा राखणे, भौतिक सुविधांच्या अनुषंगाने सकारात्मक बदलांची सुरुवात करणे, विद्यार्थी-पालक घरभेटी, पटनोंदणी, पालकांचे सामूहिक व वैयक्तिक समुपदेशन, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या सक्रिय सहभागासाठी भेट व आवाहन, लोकसहभाग, शिक्षकांना व्यावसायिक मदत व वैयक्तिक मार्गदर्शन, शालेय सर्व घटकांतील समन्वय व स्वयंशिस्त, यांसारख्या प्राथमिक तसेच आत्यंतिक गरजेच्या बाबींवर काम करण्यास सुरुवात केल्यामुळे सरांनी गेल्या वर्षीचा पट काहीसा कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.

### पुढील धोरणात्मक प्रयत्न

सरांनी ओळखल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित सर्वात महत्त्वाची बाब होती 'बौद्धिक गुणवत्ता विकास'. यासाठी असणाऱ्या अनेक निकषांपैकी सर्वाधिक प्रकर्षाने जाणवणारा निकष म्हणजे 'शालेय स्पर्धा परीक्षा' आणि त्या अनुषंगाने आठवीला असणारी 'पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा'. म्हणून या वर्गाशी संबंधित विषयाच्या शिक्षकांशी सरांनी चर्चा केली. अभ्यासक्रम, उपलब्ध वेळ व तासिका, दररोजच्या जादा तासिका, शालेय सुट्टीतील तासिका, स्थानिक परिस्थिती तसेच उपलब्ध मार्गदर्शक शिक्षक या सर्व बाबींचे तपशीलवार नियोजन केले. त्यानंतर पालक व विद्यार्थ्यांबरोबर एकत्रित घेतलेल्या बैठकीत संबंधित विषयशिक्षकांनी संपूर्ण नियोजन स्पष्ट करुन त्यांना निर्माण झालेल्या शंका व समस्या यांचे यथोचित निराकरण केले. 'शुभस्य शीघ्रम्' या उक्तीप्रमाणे शालेय कामकाजाच्या पुढच्याच दिवशी नियोजनाप्रमाणे कार्यवाहीदेखील सुरु झाली.

**ज्याप्रमाणे इयत्ता पाचवीला 'पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा' असते, त्याचप्रमाणे इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी 'पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा' या नावाने शालेय स्पर्धा परीक्षा घेतली जाते.**

### पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा

**उद्देश :** ग्रामीण व शहरी प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड करणे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना पुढील माध्यमिक शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे/ शिष्यवृत्ती देणे. त्यांचा आदर्श ठेवून इतर विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावणे.

**पात्रता :** विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. म्हणजेच त्याच्या पालकांचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे. विद्यार्थी शासनमान्य शासकीय/ अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळेत इ. ८ वी मध्ये शिकत असावा. राज्य बोर्ड (S.S.C.), केंद्रीय बोर्ड (C.B.S.C.) आणि आंतरराष्ट्रीय बोर्ड (I.C.S.C.) यांपैकी कोणत्याही बोर्डाचा अभ्यासक्रम शिकत असलेला विद्यार्थी/ विद्यार्थिनी या परीक्षेस बसण्यास पात्र असतात. विद्यार्थ्यांचे वय वर्षे विहीत केल्याप्रमाणे असावे.

(क्रमशः)

• Registered • Date of Publication : शुक्रवार, १६ मे २०२५ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



# जपून ठेवा, अनमोल ‘ठेवा’!

दोस्तांनो, तुम्ही सर्वांनीच म्युझियम, म्हणजे वस्तुसंग्रहालय पाहिलं असेल. तुमच्यापैकी काहींच्या गावातही एखादं वस्तुसंग्रहालय असेल. ऐतिहासिक वस्तू जसे की, शस्त्रे, दागिने, भांडी, उंची कापड, मूर्ती, कागदपत्रे, ठसे, शिलालेख यांसह विविध प्रकारच्या वस्तूंचा संग्रह जेथे केला जातो, त्याला वस्तुसंग्रहालय असं म्हणतात. आपल्या देशात अनेक वस्तुसंग्रहालये आहेत. त्यात आपला ऐतिहासिक वारसा सुरक्षितपणे जपला जातो आहे. अशाच प्रकारे जगभरातील ऐतिहासिक ठेवा सुरक्षित राहावा, त्याबद्दल नागरिकांमध्ये अधिक सजगता यावी या उद्देशाने आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन (१८ मे) साजरा केला जातो. त्याबद्दल...


## भारतातील महत्त्वाची वस्तुसंग्रहालये





- **इंडियन म्यूझियम,** कोलकाता
- **नॅशनल म्यूझियम,** नवी दिल्ली
- **नॅशनल रेल म्यूझियम,** नवी दिल्ली
- **द सिटी पॅलेस,** जयपूर
- **द पार्टिशन म्यूझियम,** अमृतसर
- **गांधी मेमोरिअल म्यूझियम,** मदुराई

## महाराष्ट्रातील महत्त्वाची वस्तुसंग्रहालये





- **छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय,** मुंबई
- **राजा दिनकर केळकर संग्रहालय,** पुणे
- **डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय,** पुणे
- **जहाँगीर आर्ट गॅलरी,** मुंबई
- **आगाखान पॅलेस,** पुणे
- **भारत इतिहास संशोधन मंडळ,** पुणे
- **श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय,** सातारा
- **न्यू पॅलेस,** कोल्हापूर

## भूमिका

आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिन हा दरवर्षी १८ मे या दिवशी साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय वस्तूसंग्रहालय परिषदेतर्फे (आयसीओएम) यासाठी जगभरातील विविध देशांशी समन्वय साधला जातो. दर वर्षी एक विशिष्ट संकल्पना घेऊन त्यावर आधारित कार्यक्रम राबवण्याचा संकल्प या दिवशी केला जातो. ‘वेगाने बदलत जाणाऱ्या समुदायांच्या अनुषंगाने संग्रहालयांचे भवितव्य’ ही या वर्षीची म्हणजे २०२५ची संकल्पना आहे.

## आरंभ

पहिला आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिन १९७७ मध्ये ‘आयसीओएम’च्या वतीने साजरा करण्यात आला. यामागे संग्रहालयांच्या सर्जनशील आकांक्षा आणि प्रयत्नांना एकत्रित करण्याच्या आणि त्यांच्या विविध उपक्रमांना गती देऊन त्यांच्याकडे जगाचे लक्ष वेधण्याचा उद्देश असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्या दृष्टीने दर वर्षी विविध कार्यक्रम तयार करण्यासाठीचा ठराव मांडण्यात आला. त्या ठरावानुसार आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिन साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले.

## महत्त्व


- वस्तूसंग्रहालयांमुळे ऐतिहासिक ठेवा जपण्यास मदत होते. त्यांची निगा राखली जाते.
- वस्तूंचा अभ्यास करून ती कोणत्या काळातील, शैलीची आहे, हे ठरवले जाते. त्यामुळे नागरिकांना अचूक माहिती मिळते.
- ऐतिहासिक संदर्भासाठी वस्तूसंग्रहालयांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.
- नव्या पिढीला संघर्षाची, विजयाची आणि अधिक यशस्वी होण्यासाठीची प्रेरणा वस्तूसंग्रहालयांतून मिळू शकते.

## लक्षात ठेवा...

- कोणत्याही वस्तूसंग्रहालयात गेल्यावर तेथील शस्त्र, अलंकार, कागदपत्रे, भांडी वस्तूंना स्पर्श करू नका.
- परवानगी शिवाय फोटो किंवा व्हिडिओ काढू नका.
- वस्तूसंग्रहालयातील भिंतींवर काही लिहू नका.
- वस्तूसंग्रहालयातील वस्तूंचे कोणत्याही प्रकारे नुकसान करू नका.

## आवर्जून करा...

उन्हाळी सुट्टीच्या निमित्ताने तुमच्या गावातील किंवा इतर ठिकाणी असलेल्या वस्तूसंग्रहालयाला भेट द्या. तेथे तुम्ही काय पाहिले? कोणती माहिती मिळाली? याचा सविस्तर तपशील लिहून काढा व यावर एखादा छोटा प्रकल्प तयार करून तो शाळेत सादर करा.



• Registered • Date of Publication : शुक्रवार, १६ मे २०२५ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



# जपून ठेवा, अनमोल ‘ठेवा’!

दोस्तांनो, तुम्ही सगळ्यांनीच म्युझियम- म्हणजे वस्तुसंग्रहालय पाहिले असेल. तुमच्यापैकी काहींच्या गावातही एखादे वस्तुसंग्रहालय असेल. ऐतिहासिक वस्तू- शस्त्रे, दागिने, भांडी, उंची कापड, मूर्ती, कागदपत्रे, ठसे, शिलालेख, यांसह विविध प्रकारच्या वस्तूंचा संग्रह जेथे केला जातो, त्याला वस्तुसंग्रहालय असे म्हणतात. आपल्या देशात अनेक वस्तुसंग्रहालये आहेत. त्यांत आपला ऐतिहासिक वारसा सुरक्षितपणे जपला जातो आहे. अशाच प्रकारे जगभरातील ऐतिहासिक ठेवा सुरक्षित राहावा, त्याबद्दल नागरिकांमध्ये अधिक सजगता यावी, या उद्देशाने आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन (१८ मे) साजरा केला जातो. त्याबद्दल...


## भूमिका

आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिन हा दरवर्षी १८ मे या दिवशी साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय वस्तूसंग्रहालय परिषदेतर्फे (आयसीओएम) यासाठी जगभरातील विविध देशांशी समन्वय साधला जातो. दरवर्षी एक विशिष्ट संकल्पना घेऊन त्यावर आधारित कार्यक्रम राबवण्याचा संकल्प या दिवशी केला जातो. ‘वेगाने बदलत जाणाऱ्या समुदायांच्या अनुषंगाने संग्रहालयांचे भवितव्य’ ही या वर्षीची- म्हणजे २०२५ची संकल्पना आहे.

## आरंभ

पहिला आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिन १९७७ मध्ये ‘आयसीओएम’च्या वतीने साजरा करण्यात आला. यामागे संग्रहालयांच्या सर्जनशील आकांक्षा आणि प्रयत्नांना एकत्रित करण्याच्या आणि त्यांच्या विविध उपक्रमांना गती देऊन त्याकडे जगाचे लक्ष वेधण्याचा उद्देश असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्या दृष्टीने दरवर्षी विविध कार्यक्रम करण्यासाठीचा ठराव मांडण्यात आला. त्या ठरावानुसार आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिन नियमित साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले.

## भारतातील महत्त्वाची वस्तूसंग्रहालये



- **इंडियन म्यूझियम,** कोलकाता
- **नॅशनल म्यूझियम,** नवी दिल्ली
- **नॅशनल रेल म्यूझियम,** नवी दिल्ली
- **द सिटी पॅलेस,** जयपूर
- **द पार्टिशन म्यूझियम,** अमृतसर
- **गांधी मेमोरिअल म्यूझियम,** मदुराई


## लक्षात ठेवा...

- कोणत्याही वस्तूसंग्रहालयात गेल्यावर तेथील शस्त्रे, अलंकार, कागदपत्रे, भांडी वस्तूंना स्पर्श करू नका.
- परवानगीशिवाय फोटो किंवा व्हिडिओ काढू नका.
- वस्तूसंग्रहालयातील भिंतींवर काही लिहू नका.
- वस्तूसंग्रहालयातील वस्तूंचे कोणत्याही प्रकारे नुकसान करू नका.

## महत्त्व

- वस्तूसंग्रहालयांमुळे ऐतिहासिक ठेवा जपण्यास मदत होते. त्यांची निगा राखली जाते.
- वस्तूंचा अभ्यास करून ती कोणत्या काळातील, शैलीची आहे, हे ठरवले जाते. त्यामुळे नागरिकांना अचूक माहिती मिळते.
- ऐतिहासिक संदर्भांसाठी वस्तूसंग्रहालयांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.
- नव्या पिढीला संघर्षाची, विजयाची आणि अधिक यशस्वी होण्यासाठीची प्रेरणा वस्तूसंग्रहालयांतून मिळू शकते.

## महाराष्ट्रातील महत्त्वाची संग्रहालये



- **छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय,** मुंबई
- **राजा दिनकर केळकर संग्रहालय,** पुणे
- **डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय,** पुणे
- **जहाँगीर आर्ट गॅलरी,** मुंबई
- **आगाखान पॅलेस,** पुणे
- **भारत इतिहास संशोधन मंडळ,** पुणे
- **श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय,** सातारा
- **न्यू पॅलेस,** कोल्हापूर

